# महाराष्ट्र शासन

## इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई

## कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रध्दानंद पेठ, नागपूर - 440 022**

**दुरध्वनी क्रं.** 0712-2959381 IN: U85300PN2019NPL187405 **ई मेल -** mahajyotingp@gmail.com


जा.क्र. महाज्योती/नागपूर/आस्था/3228/2024-25 **दिनांक** :- 25/11/2024

# -:परिपत्रक:-

**विषय:- महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा, केंद्रीय कर्मचारी निवड आयोग** (SSC-CGL), IBPS-PO/LIC/Railway/Banking **परीक्षा पुर्व प्रशिक्षण** 2024-25 **करीता निवड झालेल्या विद्यार्थ्यांना सूचना देणेबाबत.**

सन 2024-25 या आर्थिक वर्षात महाज्योती, मार्फत राबविण्यात येणाऱ्या महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा, केंद्रीय कर्मचारी निवड आयोग (SSC-CGL), IBPS-PO/LIC/Railway/Banking परीक्षा पुर्व प्रशिक्षण राबविण्याकरीता दि.09/06/2024 रोजी आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था (TRTI), पुणे यांचेमार्फत जाहिरात प्रसिद्ध करुन दि.15/07/2024 रोजी पर्यंत विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले होते. त्यानुसार सदर प्रशिक्षणांकरीता लाभार्थी विद्यार्थ्यांची निवड करण्यासाठी चाळणी परीक्षा महाराष्ट्र राज्यातील विविध जिल्ह्यातील परीक्षा केंद्रांवर खालीलप्रमाणे तारखेस घेण्यात आलेली होती.

| अ.क्र | प्रशिक्षणाचे नाव | चाळणी परीक्षेचा दिनांक |
|---|---|---|
| 1 | केंद्रीय कर्मचारी निवड आयोग (SSC-CGL) परीक्षा पूर्व प्रशिक्षण | दि.31/07/2024 |
| 2 | IBPS-PO/LIC/Railway/Banking परीक्षा पूर्व प्रशिक्षण | दि.01/08/2024 |
| 3 | महाराष्ट्र लोकसेवा आयोग अभियांत्रिकी सेवा परीक्षा पूर्व प्रशिक्षण | दि.14/08/2024 |

वरील दर्शविल्याप्रमाणे प्रशिक्षणांकरीता चाळणी परीक्षेचे प्रारुप निकाल दि.25/09/2024 रोजी महाज्योतीच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेले आहे.

सदर प्रशिक्षणांकरीता प्रशिक्षण संस्था निवडण्याची प्रक्रिया ही स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण अंमलबजावणी व संनियंत्रण समिती मार्फत करण्यात येणार होती. परंतु सदर समितीच्या कामकाजाबाबत विविध तक्रारी उद्‌भवल्यामुळे याची दखल घेवून महाज्योतीच्या संचालक मंडळाने सदर प्रक्रियेमधुन बाहेर पडण्याचा निर्णय घेतलेला होता.

त्यामुळे सदर प्रशिक्षणांकरीता संस्था निवडीसाठी महाज्योती मार्फत ई-निविदा प्रसिद्ध करण्यात आलेली असून सदरची निविदा प्रक्रिया ही अद्याप सुरु असल्यामुळे सदरचे परीक्षा पुर्व प्रशिक्षण हे निविदा

प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर महाज्योतीच्या संचालक मंडळाची मान्यता मिळाल्यानंतर लवकरच सुरु करण्यात येईल. सदरचे परिपत्रक हे संबंधित विद्यार्थ्यांच्या माहितीकरीता प्रसिद्ध करण्यात येत आहे. याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

(स्वा.)
विकास गडपायले
**प्रकल्प व्यवस्थापक**
महात्मा ज्योतीबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर